दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • बुधवार दि.११ फेब्रुवारी २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १६७ • पाने ४ • किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi • Wednesday 11 Feburary 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 167 • Pages 4 • Rate 4 Rs

## राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारी पासून

**मुंबई**–राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे कामकाज सोमवार दि. २३ फेब्रुवारी २०२६ ते बुधवार दि. २५ मार्च २०२६ पर्यंत निश्चित करण्यात आले आहे. दिनांक ६ मार्च २०२६ रोजी अर्थसंकल्प मांडण्यात येणार आहे, असा निर्णय कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला.विधानभवन येथे आज विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली. बैठकीला विधान परिषद सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधानपरिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, उच्च व तंत्र शिक्षण व संसदीय कार्यमंत्री चंद्रकांतदादा पाटील, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सांस्कृतिक कार्य मंत्री अँड.आशिष शेलार, आमदार सर्वश्री अनिल परब, प्रसाद लाड, भास्कर जाधव, जयंत पाटील, सुनील प्रभु, भाई जगताप, प्रवीण दरेकर, विक्रम काळे, सतेज पाटील, विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# अजितदादांचा घातपात झाला
# रोहित पवार यांचा आरोप
## VSR विमान कंपनीसह कपूर नावाच्या पायलटवरही संशय व्यक्त

### लोकांना नेमके काय घडले हे कळले पाहिजे

**रोहित पवार यांनी सांगितले की, अजितदादांच्या प्रेमापोटी त्यांनी या अपघाताबाबत शक्य ती माहिती गोळा केली. काही जण विचारतील ही माहिती कुठून आणली, कशी आणली, परंतु दादांबद्दल असलेल्या जिव्हाळ्यामुळेच हा प्रयत्न केला. आम्ही सत्तेत नसतानाही जे जमेल ते करण्याचा प्रयत्न केला. दादा आणि साहेबांनी नेहमी एकच सांगितले, प्रयत्न करत राहा. त्याच विचारातून हा संपूर्ण तपशील समोर आणण्याचा प्रयत्न केला, असे त्यांनी स्पष्ट केले. लोकांना नेमके काय घडले हे कळले पाहिजे, हीच भूमिका त्यांनी मांडली.**




दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**


अजित पवारांच्या विमान घातपाताबाबत लोकांच्या मनामध्ये अनेक प्रश्न पडले आहेत. अजित दादांचा मृत्यू झाला यावर विश्वास बसत नव्हता. मात्र ही घटना सत्य आहे. आज अजितदादा आपल्यामध्ये नसले तरीसुद्धा विचाराने ते कायम आपल्या सोबत आहेत, असे म्हणत रोहित पवार यांनी अजित पवार यांच्या अपघातावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या अपघाताबतचे सविस्तर प्रेसेंटेशन रोहित पवार यांनी सादर केले.दादा परत आले तर मी त्यांना घट्ट मिठी मारेल, असे देखील रोहित पवार यांनी म्हटले आहे. मात्र, आज अजित दादा आपल्यात नाही. आम्ही प्रयत्न करून आम्हाला ही सर्व माहिती मिळाली आहे. मग सरकारच्या एजन्सीने जर काम केलं, तर या अपघाताचे रहस्य लवकरात लवकर आपल्याला कळेल, असे म्हणत रोहित पवार यांनी अजितदादांचा घातपात झाल्याचा आरोप केला. तसेच तडठ विमान कंपनीसह कपूर नावाच्या पायलटवरही संशय व्यक्त केला.

रोहित पवार यांनी अफवांमुळे निर्माण झालेल्या संभ्रमाबाबत बोलताना एक प्रसंग सांगितला. पिंपरी चिंचवडमध्ये सिग्नलला थांबले असताना एका रिक्षाचालकाने त्यांना विचारले की, ९ तारखेला तुम्ही अजितदादांबाबत काही सांगणार होता, त्याचं काय झालं? त्यावर रोहित पवार यांनी त्याला १० तारखेला सर्व सांगणार असल्याचे उत्तर दिले. काही लोकांनी भावनिक होऊन दादा परत येतील असे व्हिडिओ टाकले, काहींनी विमानात सहा जण होते आणि दादांचे पार्थिव सापडले नाही असे सांगितले. या सर्व चर्चांमुळे लोकांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. त्यामुळेच लोकांना सत्य कळावे, म्हणून ही पत्रकार परिषद घेतल्याचे त्यांनी सांगितले.

### दादा नेहमी घड्याळ १५ मिनिटे पुढे ठेवत

**या प्रसंगी रोहित पवार अत्यंत भावुक झाले. त्यांनी सांगितले की अपघातानंतर सलग सहा दिवस त्यांना हे सर्व एखाद्या वाईट स्वप्नासारखे वाटत होते. दादांचा अपघात झालाच नाही असे त्यांना सतत वाटत होते. मात्र, जेव्हा त्यांनी अपघातानंतर मिळालेल्या काही वस्तू प्रत्यक्ष पाहिल्या, तेव्हा वास्तव समोर आले. जळालेला स्वेटर, चप्पल आणि अजितदादांच्या हातातील घड्याळ त्यांनी पाहिले. दादा नेहमी घड्याळ १५ मिनिटे पुढे ठेवत असत. त्या घड्याळात ९ वाजलेले होते आणि ते पूर्णपणे बंद पडले होते. ते दृश्य पाहून त्यांना खात्री पटली की अजितदादा आता हयात नाहीत.**

## अनोळखी प्रेताची ओळख पटविण्याचे आवाहन



दैनिक वादळ वार्ता
**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई येत टोल नाक्यावर अपघाता मध्ये मृत्यू पावलेल्या एका अनोळखी मुलाची ओळख पटविण्याचे आवाहन गेवराई पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.या बाबतची माहिती अशी की, दि. ८ फेब्रुवारी रोजी रात्री गेवराई येथील टोल नाक्यावर एका अज्ञात वाहनाच्या धडकेत एका अज्ञात मुलाचा मृत्यू झालेला आहे. त्याचे वर्णन पुढील प्रमाणे आहे रंग गोरा , वय अंगावर पांढऱ्या रंगाचा शर्ट व राखाडी रंगाची पँट असून त्याचे वय अंदाजे २५ वर्ष असावे. सदर मृतदेह हा बीड येथील जिल्हा रुग्णालयाच्या शवागृहात ठेवण्यात आलेला आहे अपघातात मयत झालेल्या इसमाला कोणी ओळखत असेल किंवा माहिती असेल त्यांनी गेवराई पोलिस स्टेशन किंवा पोलिस जमादार पिंपळे यांच्याशी संपर्क साधल्याने आवाहन करण्यात आले आहे.

## प्रशासनाची परीक्षा केंद्रावर 'धडक' भेट; उपविभागीय अधिकारी कृष्णकांत कनवरिया यांच्याकडून शहाद्यात पाहणी

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

राज्यात सध्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेचा उत्साह असून, ही परीक्षा अत्यंत पारदर्शक आणि सुरक्षित वातावरणात पार पडावी यासाठी प्रशासन सतर्क झाले आहे. याच अनुषंगाने शहादा विभागाचे उपविभागीय अधिकारी कृष्णकांत कनवरिया यांनी शहादा येथील जी.एफ.पाटील कनिष्ठ महाविद्यालय (विकास स्कूल) या परीक्षा केंद्राला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.

भेटीदरम्यान कनवरिया यांनी केंद्रावरील प्रत्येक बाबीचे बारकाईने निरीक्षण केले. यात प्रामुख्याने विद्यार्थ्यांची आसन व्यवस्था, सीसीटीव्ही देखरेख, पर्यवेक्षण यंत्रणा आणि शिस्तबद्धता यांचा समावेश होता. परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांना कोणत्याही तांत्रिक किंवा भौतिक अडचणी येऊ नयेत, यासाठी त्यांनी केंद्रावरील सोयी-सुविधांची खात्री केली. केवळ शिस्तच नाही, तर विद्यार्थ्यांनी भीतीमुक्त वातावरणात पेपर लिहावा, यावर उपविभागीय अधिकाऱ्यांनीविशेष भर दिला. केंद्रप्रमुख आणि उपस्थित कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना त्यांनी महत्त्वाच्या सूचना दिल्या त्यात परीक्षेदरम्यान नियमांचे काटेकोर पालन करून गोपनीयता राखणे.विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी आणि इतर अत्यावश्यक सुविधा तत्परतेने उपलब्ध करून देणे.कोणताही गैरप्रकार घडू नये यासाठी कडक



दक्षता बाळगणे. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्रशासन आणि परीक्षा केंद्रावरील सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते. प्रशासनाने दिलेल्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे आम्ही तंतोतंत पालन करू आणि ही परीक्षा शांततेत व जबाबदारीने पार पाडू, असे आश्वासन केंद्र प्रशासनाकडून देण्यात आले. प्रशासकीय प्रमुखांच्या या भेटीमुळे केंद्रावरील कर्मचाऱ्यांमध्ये कार्यतत्परता वाढली असून, विद्यार्थ्यांमध्येही सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

## धुळ्यात एसीबीचा मोठा दणका ८ लाखांची लाच घेताना सार्वजनिक बांधकाम विभागाचा उपअभियंता जाळ्यात

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव तालुक्यातील सोलर स्ट्रीटलाईटच्या कामाचे थकीत बिल अदा केल्याच्या मोबदल्यात ८ लाख रुपयांची लाच स्वीकारताना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उप अभियंत्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. नितीन दत्तात्रय इंगळे (वय ५३) असे अटक करण्यात आलेल्या उप अभियंत्याचे नाव असून, या कारवाईमुळे शासकीय वर्तुळात मोठी खळबळ माजली आहे.

तक्रारदार हे एक नोंदणीकृत शासकीय विद्युत ठेकेदार आहेत. त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग धुळे अंतर्गत नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव तालुक्यातील २८ गावांमध्ये एलईडी सोलर स्ट्रीटलाईट बसवण्याचे कंत्राट घेतले होते. सुमारे २ कोटी ३७ लाख २९ हजार ३५६ रुपयांच्या या निविदेचे काम तक्रारदाराने मुदतीत पूर्ण केले होते. या कामाचे उर्वरित २ कोटी २ लाख ५ हजार ५२५ रुपयांचे बिल डिसेंबर २०२५ मध्ये तक्रारदाराच्या बँक खात्यात जमा झाले होते. हे बिल अदा केल्याच्या मोबदल्यात आणि पुढील कामांच्या बिलावर सह्या करण्यासाठी आरोपी उप अभियंता नितीन इंगळे याने ८ लाख ५० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती.



लाचेची मागणी झाल्यानंतर ठेकेदाराने २७ जानेवारी २०२६ रोजी धुळे एसीबी कार्यालयात धाव घेऊन तक्रार नोंदवली. एसीबीने पंचांसमक्ष या तक्रारीची पडताळणी केली असता, इंगळे यांनी तडजोडीअंती ८ लाख रुपये स्वीकारण्याचे मान्य केले. सोमवारी, ९ फेब्रुवारी २०२६ रोजी धुळे शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सापळा रचण्यात आला. यावेळी ८ लाख रुपयांची लाच स्वीकारताना नितीन इंगळे यांना पथकाने रंगेहात पकडले.

ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक भारत तांगडे, अपर पोलीस अधीक्षक माधव रेड्डी आणि सुनील दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. धुळे एसीबीचे पोलीस उप अधीक्षक सचिन साळुंखे, पोलीस निरीक्षक यशवंत बोरसे आणि त्यांच्या पथकाने हा यशस्वी सापळा रचला.

# १३ फेब्रुवारी रोजी केज येथे शिवसेनेचा विधान सभा मतदार संघातील कार्यकर्ता संवाद मेळावा व पक्ष प्रवेश सोहळ्याचे आयोजन
## सामाजिक न्याय मंत्री ना.श्री.संजय शिरसाट,संपर्कप्रमुख मनोज शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज विधानसभा मतदार संघात आगामी राजकीय हालचालींच्या पार्श्वभूमी वर शिवसेनेने शक्ति प्रदर्शनाची जोरदार तयारी सुरू केली असून,माजी आमदार प्रा.सौ. संगीताताई ठोंबरे यांच्या शिवसेना पक्ष प्रवेशानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांनी शिवसेना उपनेते पद दिले त्यानुसार शिवसेनेचा संगठन मजबूत करण्या साठी केज विधानसभा मेळावा शुक्रवार दिनांक १३ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता केज येथील मुक्ताई मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. शिवसेनेच्या उपनेत्या व माजी आमदार प्रा.सौ. संगीताताई ठोंबरे आणि शिवसेना जिल्हाप्रमुख श्री.सचिन भैया मुळूक, शिवसेना जिल्हाप्रमुख श्री.अनिल दादा जगताप, शिवसेना जिल्हाप्रमुख श्री.स्वप्निल भैया गलधर यांच्या नेतृत्वाखाली मेळावा यशस्वी करण्या साठी नियोजन सुरू आहे केज विधानसभा मतदार संघातील माजी आमदार प्रा.सौ.संगीताताई ठोंबरे उपनेत्या शिवसेना यांच्या नेतृत्वाखाली केज विधान सभा मतदारसंघातील प्रत्येक गावात शिवसेनेची शाखा आणि शिवसेनेचा धनुष्यबाण प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचवण्यासाठी शिवसैनिकांची धडपड चालू आहे.मागील अनेक वर्षापासून शिवसैनिक केज विधानसभा मतदार संघात शिवसेनेचा भगवा फडकवावा यासाठी प्रयत्नशील असतात. माजी आमदार प्रा.सौ. संगीताताई ठोंबरे यांच्या शिवसेना पक्षप्रवेशामुळे शिवसेनेला नक्कीच चांगले दिवस येतील तसेच शिवसेनेला खंबीर नेतृत्व लाभले आहे केज विधानसभा मतदार संघातील जिल्हा परिषद पंचायत समिती तसेच जिल्हा भरातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका डोळ्यासमोर ठेवून दिनांक १३ फेब्रुवारी रोजी सामाजिक न्याय मंत्री श्री.संजयजी शिरसाट यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख श्री.सचिन भैया मुळूक शिवसेना जिल्हाप्रमुख श्री.अनिल दादा जगताप, शिवसेना जिल्हाप्रमुख श्री.स्वप्निल भैया गलधर, केज विधानसभा प्रमुख श्री.दादासाहेब ससाने शिवसेना केज तालुका प्रमुख श्री.अण्णासाहेब पाटील,युवासेना तालुका प्रमुख श्री.दत्तकुमार काकडे यांच्या उपस्थितीत शिवसैनिकांच्या महा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.या प्रसंगी मतदारसंघातील तसेच जिल्ह्यातील अनेकांचे प्रवेश देखील होणार आहेत हा कार्यक्रम मुक्ताई मंगल कार्यालय जय भवानी चौक केज या ठिकाणी होणार असून सर्व शिवसैनिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन शिवसेनेच्या उपनेत्या प्रा. सौ.संगीताताई ठोंबरे यांनी केले आहेसंघटनात्मक बांधणी, कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य आणि आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमी वर पक्षाची स्पष्ट भूमिका मांडण्यासाठी हा मेळावा महत्त्वाचा मानला जात आहे.या मेळाव्यास सामाजिक न्याय मंत्री श्री.संजय शिरसाट साहेब आणि संपर्कप्रमुख श्री. मनोज शिंदे साहेब उपस्थित राहून शिवसैनिकांना मार्गदर्शन करणार आहेत. केज विधानसभा मतदारसंघात शिवसेनेची ताकद पुन्हा एकदा एकत्र आणण्यासाठी माजी आमदार प्रा.सौ. संगीताताई ठोंबरे व शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन भैया मुळुक, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी आखलेली ही रणनिती आगामी राजकारणाच्या दृष्टीने निर्णायक ठरणार आहे. मेळाव्यास केज विधान सभा मतदारसंघातील सर्व शिवसेना पदाधिकारी , आजी माझी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पक्षाची ताकद दाखवावी, असे आवाहन उपनेत्या व माजी आमदार प्रा.सौ. संगीताताई ठोंबरे यांनी केले आहे.

# संपादकीय

## दक्षिण महाराष्ट्रातील वस्त्रोद्योगाला पुन्हा उभारीचे स्वप्न

अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी वस्त्रोद्योग क्षेत्राच्या आधुनिकीकरणावर आणि जागतिक स्पर्धेत भारताला पुढे नेण्यासाठी विविध योजना जाहीर केल्या. या योजनांच्या माध्यमातून उत्पादन क्षमता वाढवणे, रोजगार निर्मिती करणे आणि निर्यातीला चालना देण्यावर भर देण्यात आला आहे. महात्मा गांधी ग्राम स्वराज योजनेअंतर्गत खादी, हातमाग आणि हस्तकला क्षेत्राला विशेष प्रोत्साहन देण्याची घोषणा केली. या निर्णयामुळे भारतीय पारंपरिक उत्पादनांना जागतिक बाजारपेठेत प्रवेश सुलभ होणार असून, ग्रामीण भागातील कारागिरांना मोठा फायदा होणार.गतवर्षीच्या तुलनेत जवळपास दुप्पट म्हणजेच १० हजार कोटी रुपयांची आर्थिक तरतूद, पाच टप्प्यांतील (५ एफ) एकात्मिक कार्यक्रम, हातमाग–हस्तकला प्रोत्साहन, राष्ट्रीय धागा धोरण, टेक्स्ट–इको युनिव्हर्सिटी आणि शाश्वत वस्त्रोद्योगासाठी नव्या योजना अशा महत्त्वाच्या घोषणांमुळे यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पाचे दक्षिण महाराष्ट्रातील वस्त्रोद्योग क्षेत्रातून स्वागत होत आहे. अमेरिकेच्या कर धोरणांमुळे अडचणीत सापडलेल्या भारतीय वस्त्रोद्योगाला या उपाययोजनांमुळे नवी दिशा मिळेल आणि निर्यातीचे दालन अधिक खुले होईल, अशी अपेक्षा उद्योगजगताकडून व्यक्त केली जात आहे. कोल्हापूर सांगली सोलापूर जिल्ह्यामध्ये वस्त्रोद्योगाचे केंद्राच्या धोरणावर अवलंबून असणारे भवितव्य त्याच्या अर्थसंकल्पाने थोडे उजळ दिसू लागले आहे. अमेरिकेच्या टॅरीफ धोरणाबरोबरच अनेक स्थानिक मुद्द्यांमुळे सुद्धा या व्यवसायाला घरघर लागली आहे. इथल्या उद्योजक व्यावसायिक कामगार आणि इतर घटकांनीच केवळ विचार करून या क्षेत्राचे भले होणार नव्हते. पण, याबाबत अधिकची पावले तोपर्यंत त्याला भवितव्य दिसत नव्हते. देशातील वस्त्रोद्योग हा जागतिक बाजारपेठेतील चढ–उतार, कच्च्या मालाच्या किमती, आंतरराष्ट्रीय व्यापार धोरणे आणि देशांतर्गत खर्चवाढ अशा अनेक कारणांमुळे दबावाखाली आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणी गेल्या काही महिन्यांपासून विविध वस्त्रोद्योग संघटनांनी लावून धरली होती. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी यंदाच्या अर्थसंकल्पात या मागण्यांची दखल घेतल्याचे स्पष्ट दिसते. मागील वर्षी सुमारे साडेपाच हजार कोटींची तरतूद असताना यंदा ती थेट १० हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. यामुळे रोजगारनिर्मिती, निर्यातवाढ आणि उद्योगातील गुंतवणूक वाढीस चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.वस्त्रोद्योगात गुंतवणूक वाढावी आणि संपूर्ण मूल्यसाखळी सक्षम व्हावी यासाठी ‘५ एफ’ धोरण जाहीर करण्यात आले आहे. कापूस ते धागा, धागा ते कारखाना, कारखाना ते फॅशन, फॅशन ते विदेश आणि विदेशातील बाजारपेठ असा हा पाच टप्प्यांचा एकात्मिक कार्यक्रम आहे. कृषी उत्पादनापासून थेट आंतरराष्ट्रीय विक्रीपर्यंतची साखळी मजबूत करण्याचे उद्दिष्ट या धोरणामागे आहे. दक्षिण महाराष्ट्रातील कापूस उत्पादक शेतकरी, सूतगिरण्या, यंत्रमाग, प्रोसेसिंग युनिट्स आणि रेडिमेड वस्त्र उद्योगाला याचा थेट फायदा होण्याची शक्यता आहे. रेशीम, लोकर, ताग, मानवनिर्मित तंतू आणि नव्या काळातील आधुनिक तंतू या सर्वांमध्ये स्वावलंबन साधण्यासाठी ‘राष्ट्रीय धागा योजना’ जाहीर करण्यात आली आहे. यासोबतच मेगा टेक्स्टाईल पार्क स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला असून त्यामुळे आधुनिक पायाभूत सुविधा, मोठी गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळेल. ग्रामीण भागात खोलवर रुजलेल्या राष्ट्रीय हातमाग व हस्तकला क्षेत्राला महात्मा गांधी ग्राम स्वराज्य उपक्रमाच्या एकात्मिक प्रणालीत समाविष्ट करण्याचा निर्णय घेतल्याने विणकर व कारागिरांना मोठा दिलासा मिळणार आहे. जागतिक स्तरावर स्पर्धात्मक व शाश्वत वस्त्रनिर्मितीसाठी ‘टेक्स–इको इनिशिएटिव्ह’ सुरू करण्याची घोषणा हीदेखील भविष्यासाठी महत्त्वाची ठरणार आहे. वस्त्रोद्योग विस्तार व रोजगार योजनेअंतर्गत क्लस्टर आधुनिकीकरण, तंत्रज्ञान सुधारणा आणि सामायिक चाचणी सुविधा उभारल्यास उत्पादनक्षमता वाढून मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होईल, असे मत राज्य वस्त्रोद्योग महासंघाचे अध्यक्ष अशोक स्वामी यांनी व्यक्त केले आहे. मात्र, त्याचबरोबर विकेंद्रित यंत्रमाग, सूतगिरण्या, सायझिंग, प्रोसेसिंग युनिट्स आणि गारमेंट हाऊस यांच्यासाठी स्वतंत्र व लक्ष केंद्रीत धोरणाची गरज असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. दक्षिण महाराष्ट्रात ही विकेंद्रित यंत्रणा मोठ्या प्रमाणात असल्याने त्याकडे दुर्लक्ष होता कामा नये, असे उद्योगतज्ज्ञांचे म्हणणे आहे. वस्त्रोद्योगासाठी जाहीर करण्यात आलेल्या पंचसूत्री कार्यक्रमामुळे उद्योगवाढीला आणि निर्यातीला नवी गती मिळेल, असा विश्वास इचलकरंजी पॉवरलूम असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केला.विस्तार योजना आणि तंत्रज्ञान सुधारणा यामुळे उद्योजकांना आधुनिकीकरणाच्या मार्गावर नेण्यास मदत होणार असल्याने अर्थसंकल्पाचे स्वागत केले जात आहे. एकूणच, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली, सोलापूर आदी दक्षिण महाराष्ट्रातील वस्त्रोद्योग केंद्रांना या अर्थसंकल्पातून पुन्हा उभारी मिळण्याचे स्वप्न दिसू लागले आहे. योग्य अंमलबजावणी आणि विकेंद्रित क्षेत्रालाही समान न्याय मिळाल्यास हा परिसर पुन्हा एकदा देशातील वस्त्रोद्योगाचा कणा ठरेल, अशी आशा व्यक्त होत आहे. दक्षिण महाराष्ट्राला मुंबई–पुणे, पुणे–हैदराबाद हाय–स्पीड रेल्वे, शहर आर्थिक क्षेत्र, १ लाख कोटी शहरी आव्हान निधी, एमएसएमई प्रोत्साहन, गिग वर्कर्स सुरक्षा अशा प्रकारे लाभ मिळेल.

या भागातील अनेक गाव आणि शहरांचा समावेश होत आहे. लक्षात घेता दक्षिण महाराष्ट्राला अधिक वेगवान बनवणारे ठरत आहेत. गोव्याला आणि कोकणाला आयआयटी विस्तार, वैद्यकीय पर्यटन, नारळ योजना, मत्स्यव्यवसाय प्रोत्साहन. बेळगावला कृषी योजना, रेल्वे प्रकल्प. कोकण व पश्चिम महाराष्ट्राला बंदर जोडणी, काजू–कोको योजना, जलमार्ग विकास यांचा फायदा होईल आणि त्याचा प्रभाव दक्षिण महाराष्ट्रावर आपोआप पडेल. एकूणच या भागात पायाभूत सुविधा, रोजगार, कृषी वृद्धीला चालना मिळेल.

# भारतीय किसान संघाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांचा विशाल मोर्चा निघणार-आप्पाराव यादव

**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी भारतीय किसान संघाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर दि.२३ फेब्रुवारी २०२६ रोजी भारतीय किसान संघाचे महाराष्ट्र प्रांताध्यक्ष बळीरामजी सोळुंके यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचा विशाल मोर्चा निघणार असल्याची माहिती जिल्हा मंत्री आप्पाराव यादव यांनी दिली.यासंदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात यादव यांनी पुढे म्हटले आहे की,बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध समस्या संदर्भात वारंवार विनंती करूनही समस्या सुटत नसल्याने बीड जिल्ह्यातील शेतकरी वर्ग संतप्त झाला असून, त्यांनी पी एम व सीएम सन्मान निधीत दुप्पट वाढ करावी,सन २०२५ मध्ये खरीप हंगामात जाहीर केलेला १७५०० रुपयांचा विमा त्वरित द्यावा, खेड्यातील पांदण रस्त्यांची कामे तात्काळ सुरू करून येत्या खरीप हंगामापूर्वी पूर्ण करावीत, २०२५ च्या अतिवृष्टीने जिल्ह्यातील अनेक रस्ते खड्डेमय झाले ते तात्काळ बुजविण्यात यावेत,गाव जोड रस्ते,ग्रामीण मार्ग, प्रमुख जिल्हा मार्गाचे तात्काळ मजबुतीकरण करावे,सोलार पंप करिता ज्या शेतकऱ्यांनी शेतकरी हिस्सा भरलेला आहे. त्यांचे सोलार पंप तात्काळ बसवावेत,सध्या पारंपारिक ऊर्जेचे कोटेशन देणे बंद केले आहे ते भरून देऊन तात्काळ कनेक्शन द्यावे, पूर्ण दिवसभर बारा तास विद्युत पुरवठा पूर्ण दाबाने सातत्याने द्यावा,विद्युत वितरण विभागाच्या गलथान कारभारामुळे ज्या शेतकऱ्यांचा ऊस जळालेला आहे त्याची नुकसान भरपाई तात्काळ देण्यात यावी,प्रवाही सिंचनाची वाढवलेली पाणीपट्टी कमी करण्यात यावी,पैठण उजव्या कालव्याच्या वितरिका, उपवितरिका,लघु वितरिकांचे टेल पर्यंत लाइनिंग करून द्यावी, यासाठी संपादित केलेली जमीन शेतकऱ्यांच्या नावावरून कमी करावी, सर्व शेतमालाचीशासकीय हमीभावाने खरेदी बारा महिने चालू ठेवावी, गोदावरी नदीवरील राजा टाकळी,ढालेगाव,तपे निमगाव,रामपुरी, बबूलतारा व इतर शिवारातील संपादित क्षेत्राचा मोबदला विना विलंब द्यावा, शेतकऱ्यांकडे असलेले पीक कर्ज सरसकट मार्च २०२६पूर्वी माफ करण्यात यावे,महा डीबीटी पोर्टल वरील निवड करण्यात आलेले वाहने व इतर यांत्रिकी कारणासाठी निवड करण्यात आलेल्या शेतकऱ्यांना पूर्वसंमती देण्यात यावी,शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या यांत्रिकी करणाची



अनुदानित रक्कम शेतकर्यांच्या खात्यावर लवकरात लवकर जमा करावी,पी एम किसान सन्मान निधीच्या काही लाभार्थ्यांची रक्कम खात्यावर येणे बंद केले आहे ती पूर्ववत सुरू करावी, २०१९ पूर्वीचे फेरफार असणारे हजारो शेतकरी पीएम व सीएम किसान निधी पासून वंचित आहेत त्यांना सन्माननिधी लवकरात लवकर सुरू करावा, भूमीहीन लोकांना स्वस्त धान्य दुकानांमार्फत धान्य देण्यात यावे,सुशिक्षित बेकार व बेरोजगार तरुणांना उद्योगासाठी कर्ज पुरवठा करण्यात यावा,वन्य प्राण्यांना वनखात्याकडून बंदोबस्त करावा अन्यथा वन्य प्राण्यांनी शेती पिकाचे जे नुकसान केले त्याचे नुकसान भरपाई सात दिवसात मिळावी,वन्य प्राण्यांपासून पिकाचे संरक्षण व्हावे म्हणून मागील त्याला ९०% अनुदानावर कुंपण द्यावे, ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) ग्रामसेवक, कृषी सहाय्यक यांनी मुख्यालयाच्या ठिकाणी राहावे,अशा मागण्या भारतीय किसान संघाने केल्या असून या मागण्या २२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सोडविण्यात याव्यात अन्यथा नाईलाजाने २३ फेब्रुवारी २०२६ रोजी आपल्या कार्यालयावर भारतीय किसान संघ जिल्हा शाखा बीड च्या वतीने मोर्चा काढण्यात येईल त्यामुळे होणाऱ्या परिणामांची जबाबदारी प्रशासनावर राहील असा गर्भित आप्पाराव यादव यांनी इशारा ही दिला आहे.या निवेदनावर भारतीय किसान संघाचे पदाधिकारी तुकाराम चोपडे,बाळासाहेबभोजने, प्रकाश कुलकर्णी,अशोक तौर,भीमराव शिंदे, ज्ञानेश्वर घोलप,काशिनाथ आदमोरे,अशोक मस्के, भास्कर आगे,गोवर्धन कर्डिले,साधू जाधव, सौ.प्रेमाताई यादव यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जलजीवन मिशन,रेल्वेसाठी निधी अन् स्वारातीसाठी कर्मचारी द्या

## खा.बजरंग सोनवणे यांनी बीडच्या मागण्यांसाठी संसद दणाणून सोडली,अर्थसंकल्पाला म्हणाले जुमला बजेट

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड: । प्रतिनिधी**

हर घर जल, म्हणत जलजीवन मिशन योजनेचा मोठा गाजावाजा केला जातो, एकीकडे या योजनेचा निधी लॅप्स होतो, तर दुसरीकडे माझ्या जल्हियात कामे पुर्ण करण्यासाठी निधी दिला जात नाही. धाराशिव–बीड–छत्रपती संभाजीनगर रेल्वे होणे आवश्यक असून त्यासाठी निधी द्यावा, याच बरोबर अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तर्थि वैद्यकिय रूग्णालयासाठी कर्मचाऱ्यात वाढ करावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत केली.सन २०२६–२०२७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पावर लोकसभेत चर्चा करताना बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी सरकारवर तीव्र शब्दांत टीका केली. सदर अर्थसंकल्पात कोणताही स्पष्ट दृष्टीकोन, ठोस धोरण अथवा देशवासीयांसाठी काहीतरी करण्याची इच्छाशक्ती दिसून येत नसल्याचा आरोप त्यांनी केला. हा अर्थसंकल्प घाईघाईत, जमिनीवरील वास्तव न समजून तयार करण्यात आल्याचे सांगत त्यांनी याला ’जुमला बजेट’ असे संबोधले.खा.सोनवणे म्हणाले, मागील अर्थसंकल्पातीलच मुद्दे यावेळी केवळ रंगरंगोटी करून पुन्हा मांडण्यात आले आहेत. अर्थमंत्र्यांनी मोठ्या–गाजावाजात जाहीर केलेली ’सुधार एक्सप्रेस’ ही संकल्पना केवळ घोषणाबाजीपुरती मर्यादित आहे. सरकारने ३५० हून अधिक सुधारणा केल्याचा दावा केला असला तरी त्या नेमक्या कोणत्या, याचा तपशील सभागृहासमोर मांडण्यात आलेला नाही. जीएसटी व्यतिरिक्ति कोणती ठोस सुधारणा झाली, हेही अस्पष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले.जीएसटीबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, हा कर कोणतीही चर्चा न करता मध्यरात्री लागू करण्यात आला. विरोधकांनी सूचनांचा आग्रह धरला असतानाही सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. आज जीएसटीमुळे व्यापारी, उद्योजक व सामान्य नागरिक अडचणीत आले असून, त्यांच्या नुकसानीची भरपाई सरकार देणार का, असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.

**उद्योग बंद पडण्याच्या मार्गावर**

एमएसएमई क्षेत्राबाबत सरकार केवळ आश्वासने देत असल्याची टीका करत सोनवणे म्हणाले की, लघु व मध्यम उद्योग आज बंद पडण्याच्या मार्गावर



आहेत. उत्पादन क्षमता असूनही बाजारव्यवस्थेसाठी ठोस धोरण नसल्याने भारत केवळ उपभोक्ता देश बनत चालला असून, याचा फायदा परदेशी कंपन्या घेत आहेत, असेही खा.सोनवणे म्हणाले.

**रूग्णालयाचा मुद्दा गाजला**

आरोग्य क्षेत्राबाबत बोलताना खासदार सोनवणे यांनी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महावद्यिालयाचा मुद्दा मांडला. दररोज हजारो रुग्ण येत असतानाही डॉक्टर, नर्स व उपकरणांची कमतरता असल्याचे त्यांनी सांगितले.ग्रामीण विकास, पाणीपुरवठा, रेल्वे क्षेत्रातील दुर्लक्षावरही त्यांनी सरकारवर टीका केली.

**४०० गावात नाही टॉवर**

बीड जल्हिा हा कष्टकरी, शेतकरी, ऊसतोड कामगारांचा जल्हिा आहे. याठिकाणी अद्याप अनेक सुविधा उपलब्ध नाहीत. जल्हि्यातील ४०० गावात अद्याप मोबाईल टॉवर नाहीत. यामुळे नागरिकांची मोठी अडचण होत आहे. सरकारने बीएसएनएल सारख्या कंपन्यांकडून त्याठिकाणी टॉवर उभा करावेत, अशी मागणीही खा.सोनवणे यांनी केली.

**लखपती दीदी योजना निवडणूकीपुरती**

’लखपती दीदी’ योजना ही केवळ निवडणूक केंद्रित घोषणा ठरली आहे. देशातील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न मात्र गंभीर असून, त्यासाठी सरकारकडे कोणतेही ठोस धोरण नाही, अशी टिकाही खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत केली.

# परळीतील यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालय येथे बारावीच्या परीक्षा सुरळीत सुरू

**दैनिक वादळ वार्ता**
**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत आजपासून बारावीची परीक्षा सुरू झाल्या आहेत. परळी वैजनाथ शहरातील यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयच्या परीक्षा शारदाविद्यामंदिर, बँक कॉलनी येथे इयत्ता बारावीच्या परीक्षा सुरळीत सुरू असल्याची प्रतिक्रिया केंद्रप्रमुख एस.आर.कापसे यांनी दिली. नाथ शिक्षण संस्था संचलित, परळी वैजनाथ संचलित यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालय येथे इयत्ता बारावीच्या परीक्षा शिक्षण विभागाच्या निर्देशाचे पालन करत परीक्षा सुरळीत सुरू आहेत. परिक्षा केंद्रावर चोख पोलिस बंदोबस्त होता. तसेच यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयच्या बारावीच्या परीक्षा शारदाविद्यामंदिर येथे सुरळीत सुरू आहे. परीक्षा केंद्रावर कडक शिस्तीत बारावीच्या कॉपीमुक्त परीक्षा पार पडत आहेत. परीक्षा केंद्रांवर भरारी पथक व बैठे पथक, सीसीटीव्ही निरीक्षण व सतत तपासणी व प्रशासनाची काटेकोर नजर ठेवण्यात आली असून विद्यार्थ्यांना शांत, सुरक्षित आणि शिस्तबद्ध वातावरणात परीक्षा देता येत आहे.इयत्ता १२ वीच्या परीक्षेतील पहिला इंग्रजी विषयाचा आज पेपर सुरळीत पार पडला या केंद्रावर २७८ विद्यार्थी परीक्षा देत आहेत.शासनाच्या निर्देशानुसार यावर्षीची परीक्षा कॉपीमुक्त व भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या असून, त्याचाच एक भाग म्हणून बारावीच्या पहिल्या इंग्रजी विषयाच्या पेपरची परीक्षा यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयच्या परीक्षा शारदाविद्यामंदिर, बँक कॉलनी येथे इयत्ता बारावीच्या परीक्षा या केंद्रांवरील परीक्षा शांततापूर्ण व पारदर्शक वातावरणात पार पडली.



# तुलसी आय.टी.कॉलेजमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगतीबरोबरच सांस्कृतिक क्षेत्रातही सक्रिय सहभाग नोंदवून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करावी. अशा उपक्रमांमुळे व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असे प्रतिपादन जिल्हा कौशल्य विकास केंद्राचे सहाय्यक आयुक्त समाधान किरवले यांनी केले. देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे मंगळवार दि. १० रोजी आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनात ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा.डॉ. प्रेमचंद सिरसाट, प्रा. अर्जुन राठोड, आयु.दीपा रोडे, प्रा.डी.डी.राऊत, डॉ.विजयकुमार बांदल, प्रा.प्रकाश ढोकणे,




डॉ.सुनील जोंधळे आणि प्राचार्य डी.जी.निकाळजे उपस्थित होते.यावेळी मार्गदर्शन करताना समाधान किरवले म्हणाले की, स्नेहसंमेलने विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देतात आणि त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करतात. प्रमुख पाहुणे डॉ. प्रेमचंद सिरसाट यांनी विद्यार्थ्यांना संकटांवर मात करून ध्येय गाठण्यासाठी जिद्द व मेहनतीचा मंत्र दिला. प्राचार्य डी. जी. निकाळजे यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था सातत्याने कार्यरत असल्याचे सांगितले.अध्यक्षीय भाषणात प्रा. प्रदीप रोडे यांनी राष्ट्रप्रेमावर विशेष भर दिला. ते म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनुसार आपण सर्वांनी प्रथम ’भारतीय’ म्हणून आपली ओळख जपली पाहिजे. महापुरुषांचे विचार अंगीकारल्यास देश महासत्ता होण्याचा मार्ग सुकर होईल. तसेच, पैशाच्या मागे धावताना माणुसकी विसरू नका आणि मोठ्या पदावर गेल्यानंतर समाजाचे ऋण फेडणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे त्यांनी नमूद केले.उद्घाटनानंतर महाविद्यालयातील विविध स्पर्धांमधील विजेत्यांना प्रमाणपत्रे व स्मृतीचिन्हे देऊन सन्मानित करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. यामध्ये भरतनाट्यम आणि लावणीचे बहारदार सादरीकरण ,कोळीगीत आणि देशभक्तीपर गीतांवर आधारित नृत्ये, गायन व वाद्यसंगीताचे वैविध्यपूर्ण कार्यक्रम पार पडले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदित्य ठोंबरे व रोहित गव्हाणे यांनी केले, तर आभार डॉ. योगिता लांडगे यांनी मानले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# अबकड आरक्षण लढ्यासाठी मातंग समाजाच्या अनेक संघटना एकत्र

## चिंतन बैठकीत समाज एकजूटीचा निर्धार

दैनिक वादळ वार्ता
**नायगाव । प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षापासून मातंग समाजाचे अ ब क ड वर्गीकरणाची मागणी शासन दरबारी अपुरीच राहिली मातंग समाजातील विविध सामाजिक संघटना याबाबत लढा दिले दिल्यानंतरही सरकारकडून ही मागणी पूर्ण झाली नाही.अखेर समाजातील विविध सामाजिक संघटना एकत्र येऊन अ ब क ड वर्गीकरण करण्यासाठी आता एकजुटीचा आवाज उठवणार असल्याने याबाबत दि. ०८ फेब्रुवारी रोजी मराठवाड्यातील निवडक बुद्धीजीवी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, सेवानिवृत्त अधिकारी, प्राध्यापक कर्मचारीवर्ग यांची बैठक मुक्ताई नर्सिंग कॉलेज नांदेड येथे प्रा. डॉ. जी. एल. सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

आयोजित केलेल्या चिंतन बैठकीमध्ये लोकस्वराज्य आंदोलनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.प्रा.रामचंद्र भरांडे,अण्णा भाऊ साठे क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष सचिनभाऊ साठे आणि लालसेनेचे संस्थापक अध्यक्ष कॉ.गणपत भिसे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुक्ताई नर्सिंग कॉलेज नांदेड येथे या बैठकीला समाजाचे जेष्ठ नेते तथा लहुजी सेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णू भाऊ कसबे हे काही अडचणींमुळे उपस्थित राहू शकले नाहीत.

देशात न्याय, समता व बंधुता मूल्य आधारित सर्वांना दर्जाची सामान संधी प्राप्त व्हावी यासाठी अनु.जाती व जमातीना भारतीय संविधानात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आरक्षणाची तरतूद केली आहे. पण सर्वच जातींना त्याचा पाहिजे तेवढा लाभ अजून पर्यंत मिळाला नाही. त्यामुळे अनेक जात समुह या आरक्षणाच्या लाभापासून वंचित राहिले आहेत,ही सद्यस्थिती आहे. त्यामुळे बंद
डॉ .बाबासाहेबांना अभिप्रेत असलेल्या न्याय समता व दर्जाची सामान संधीचे स्वप्न अधुरे राहिले आहे.

डॉ. बाबासाहेबांचा न्याय समता हाच धागा पकडून देशाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या सहा विरुद्ध एक अशा ०७ सदस्यीय खंडपिठाने दि. ०१ ऑगस्ट २०२५ रोजी आरक्षणावर निरीक्षण नोंदवतांना असे स्पष्ट केले आहे की.अनु.जातीला असलेल्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करणे गरजेचे असून ते केले पाहिजे.उपवर्गीकरण करण्याचा अधिकार त्या त्या राज्य सरकारला आहे.तो अधिकार वापरून त्यांनी आपापल्या राज्यात उपवर्गीकरण करू शकतात. असे स्पष्ट मत नोंदवले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या उपवर्गीकरण करण्याचा निर्णय जाहीर होताच देशातील अनेक राज्यात तात्काळ उपवर्गीकरण लागू करण्यात आले आहे. पण महाराष्ट्रात गेली पंचवीस वर्षांपासून उपवर्गीकरणाची मागणी असतांना व त्यासाठी अनेक मोर्चे,आंदोलने, आमरण उपोषणे होऊन तर आता सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय असून सुद्धा पुरोगामीत्वाचा टेम्भा मिरवनारे महाराष्ट्राचे राज्य सरकार वारंवार उपवर्गीकरणाचा विषय जाणीवपूर्वक प्रलंबीत ठेवत आहे. त्याबद्दल महाराष्ट्रातील काही प्रमुख संस्था प्रमुखांची चिंतन व नियोजन बैठक नांदेड येथे नुकत्याच घेण्यात आली होती.या बैठकीत उपवर्गीकरण तात्काळ लागू करावे. उपवर्गीकरण होई पर्यंत राज्यातील नोकरभर्तीला स्थगती द्यावी. अन्यथा मातंग समाज व तत्सम आरक्षण लाभ वंचित जात समुहाच्या वतीने सरकारला जाब विचारण्यासाठी येणाऱ्या अधिवेशनावर मातंग समाज व महाराष्ट्रातील सर्व सामाजिक संघटनाना सोबत घेऊन सर्वांच्या वतीने मंत्रालयावर प्रचंड महामोर्चा काढण्यात येईल असे नियोजन ठरले आहे.अनु.जातीला असलेल्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करून आरक्षणापासून लाभ वंचित असलेल्या जात समूहाला शैक्षणिक व नोकरीच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सदरहू बैठकीत मातंग आणि तत्सम जातींच्या उद्धाराची आरक्षण वर्गीकरणाची चळवळ प्रामाणिकपणे,निस्वार्थपणे आणि निष्ठेने लढण्याची आवश्यकता असून त्यासाठी अशा नेतृत्वाच्या पाठीशी सामाजाने उभे राहण्याचा आणि समाजातील इतर घटकांनी स्वयंसेवकांच्या भूमिकेत योगदान देण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीत उपस्थित बुद्धीजीवी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी आरक्षण वर्गीकरणाची चळवळ गतिमान करून आरक्षण वर्गीकरण समाजाच्या पदरात लवकर पाडून घेण्यासाठी सचिन भाऊ साठे,डॉ.रामचंद्र भरांडे,आणि कॉ.गणपत भिसे यांनी एकत्र येऊन व्यापक लढा उभारण्याचे आवाहन केले. त्यास सचिन भाऊ साठे,डॉ.रामचंद्र भरांडे आणि गणपत भिसे या नेत्यांनी समाजाच्या उद्धाराच्या या विषयासाठी आम्ही बांधील असून संघटना,पक्ष किंवा विचारधारा सर्व काही बाजूला ठेवून एकजुटीने व्यापक लढा उभारण्यासाठी तयार असल्याचे सांगितले. बैठकीच्या शेवटी पुढील लढ्याचा कृति कार्यक्रम तयार करण्यासाठी या नेत्यां समवेत लवकरच बैठक आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सदरील बैठकीचे सूत्रसंचालन परमेश्वर बंडेवार अण्णा भाऊ साठे क्रांती आंदोलनाचे राज्यउपाध्यक्ष यांनी केले. प्रास्ताविक केशव शेकापूरकर अभ्यासक,लेखक यांनी केले. तर डॉ. माधवराव लोकडे, लालबाजी घाटे,शिवा कांबळे यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले.या बैठकीस लोकस्वराज्य आंदोलन,अण्णा भाऊ क्रांती सेना,लालसेना, अण्णा भाऊ साठे क्रांती आंदोलन, लसाकम व विविध संघटना प्रमुख, पदाधिकारी जिल्हा व राज्य अध्यक्ष तथा जबाबदार व्यक्तीसह जवळपास ५० प्रमुख मान्यवरांची उपस्थिती होती.शेवटी लसाकमचे नांदेड जिल्हाध्यक्ष विजय रणखांब यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# किनवट तालुक्यात घरकूल योजनांना 'तांत्रिक' ग्रहण : लाभार्थी संकटात

## घरकुलांची कामे अद्यापही अपूर्णच

दैनिक वादळ वार्ता
**किनवट । प्रतिनिधी**



पंतप्रधान आवास योजनेसह
विविध गृहनिर्माण योजनांच्या माध्यमातून पक्क्या घराचे स्वप्न पाहणाऱ्या तालुक्यातील हजारो लाभार्थ्यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. पूर्वी देयके सादर केल्यावर दोन दिवसांत जमा होणारा घरकुलांचा हप्ता महिना उलटूनही मिळत नाही. त्यामुळे गरिबांच्या घरांची बांधकामे अर्धवट अवस्थेत रखडली आहेत. पंचायत समितीच्या घरकूल विभागात चकरा
मारून लाभार्थी मेटाकुटीला आले आहेत. शासनाकडून मिळणारे घरकूल अनुदान तुटपुंजे असून बांधकामासाठी लागणाऱ्या साहित्यांचे भाव गगनाला भिडले आहेत. त्यात वाळू मिळणे कठीण झाले आहे. अनेक लाभार्थ्यांनी आपली
जुनी घरे मोडून उघड्यावर पाल किंवा पत्र्याचे शेड उभारुन नव्या घराचे काम सुरू केले. मात्र हप्ते वेळेवर न आल्याने काहींचे पाया तर काहींचे लेंटल स्तरावर काम अडकून पडले आहे.
प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण (टप्पा १ व २), पीएम जनमन, रमाई, शबरी आणि मोदी आवास योजनांतर्गत हजारो घरांची बांधकामे आजही अपूर्ण आहेत. डीएसीचा' तांत्रिक प्रश्न आता सुटला असून यंत्रणा कार्यान्वित झाली आहे. जसे प्रस्ताव प्राप्त होत आहेत, तशी कार्यवाही सुरू आहे. दुसऱ्या हप्त्याची जेवढी देयके प्रलंबित असून येत्या काही दिवसांत निकाली काढण्याचा प्रशासनाचा पूर्ण प्रयत्न आहे. असे अधिकार्याकडून बोलले जात आहे.

तांत्रिक बिघाड आणि 'स्पर्श' प्रणालीचा खोडा

लाभार्थ्यांचे मस्टर आणि देयके रखडण्यामागे 'डीएसी' डिजिटल सिग्नेचर
सर्टिफिकेट समस्या, निधीचा अभाव आणि नवीन 'स्पर्श' प्रणालीतील तांत्रिक अडचणी कारणीभूत ठरत आहेत. हप्ते जमा होत नसल्याने इकडून तिकडून पैशांची जमवाजमव करणाऱ्या लाभार्थ्यांचे कंबरडे मोडले आहे. नव्हे लाभार्थी आर्थिक संकटात सापडले असल्याचे सद्यः स्थितीत पहावयास मिळत आहे.

# खरोसा जिल्हा परीषद गटात महाविकास आघाडीचे वर्चस्व; तानाजी जाधव विजयी

## खरोसा गटातील जनतेनी विकासाच्या मुद्यावर आम्हाला मतदान रुपी आशिर्वाद दीला असुन येणार्या काळात खरोसा गटातील जनता दैवत मानुन मनोभावे सेवा करणार तानाजी जाधव



दैनिक वादळ वार्ता
**औसा । प्रतिनिधी**

औसा तालुक्यात पार पडलेल्या जिल्हा परीषद व पंचायत समिती निवडणुकीत औसा तालुक्यातील खरोसा जिल्हा परीषद गटावर महाविकास आघाडी (शिवसेना उ.बा.ठा) पक्षाचे अधिक्रत उमेदवार तानाजीराव जाधव यांनी दणदणीत विजय मीळवला असुन .विजयाचा जल्लोष खरोसा पाटी ते खरोसा चौक येथे जेसीबीतुन गुलालाची उधळण , डि जे च्या तालावर थिरकत फुलांची उधळण करत आनंदोत्सव जल्लोशात साजरा केला ,यावेळी खरोसा जिल्हा परीषद गटातील मतदारांनी मला मतदान रुपी आशिर्वाद देउन विजयी केल्याबद्धल तानाजी जाधव यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगीतले तर
दुसरीकडे,शिवसेना(उ.बा.टा )
सह कॉंग्रेस आघाडीचे अधिक्रत उमेदवार तानाजीराव जाधव हे खरोसा जिल्हा परीषद गटातील अनेक गावोगावी विकासाची वाटचाल करण्यासाठी व खरोसा गटातील लोकांना शिक्षण ,रोजगार ,महिला सक्षमिकरन अशे अनेक मुद्दे प्रचारात चालवत एकजुटीचा दावा करत धगधगती मशाल पेटवण्याचा विश्वास व्यक्त केला होता व आज तानाजीराव जाधव यांच्या नेत्रत्वावर विश्वास ठेउन खरोसा जिल्हा परीषद गटातील जनतेनी विकासात्मक कामाचा माणुस निवडुण दील्याची भावना तानाजी जाधव यांनी बोलुन दाखवली ,माझी निवडणुक खरोसा गटातील जनतेने हातात घेतली व मला भरघोस मतांनी निवडुण दीले त्याबद्धल मी खरोसा गटातील मतदारांचे आभार मानतो व मला सेवा करण्यांची संधी दीली त्याबद्धल आभार मानतो व माझ्या सहकारी कार्यकर्त्यांनी जिवाच राण करुन प्रचार काळात काम केल त्याबद्धल मी माझ्या सहकार्यांच मनपुर्वक आभार मानतो,

# आदर्श विद्यालयातील कु.प्रिती रवींद्र जगताप हिचे नॅशनल लेवलच्या Abacus स्पर्धेत मोठे यश

दैनिक वादळ वार्ता

छत्रपती संभाजीनगर येथे घेण्यात आलेल्या सदगुरु G champ Abacus नॅशनल लेवल कॉम्पिटीशन २०२६ ऑनलाईन आणि ऑफलाईन कॉम्पिटिशन मध्ये आदर्श माध्यमिक विद्यालयातील कु.प्रिती रवींद्र जगताप हिने ऑनलाईन कॉम्पिटिशन मध्ये १०० पैकी ९८ मार्क घेऊन प्रथम क्रमांक मिळवला तसेच offline कॉम्पिटिशन मध्ये १०० पैकी १०० गुण घेऊन सुपरस्टार ट्रॉफीची मानकरी ठरली.त्याबद्दल संस्थेच्या वतीने शाळेच्या प्राचार्या श्रीम.औटी मॅडम यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले व शुभेच्छा दिल्या.तिच्या या यशाबद्दल सर्वत्र तिचा गौरव व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.शाळेतील सर्व शिक्षकांनी तिला भरभरून शुभेच्छा दिल्या.



# उदगीर तालुक्यात आ.संजय बनसोडे यांची जादू कायम,राष्ट्रवादीचे तीनही उमेदवार बहुमताने विजयी, भाजपचे दोन तर कॉंग्रेसचे ही दोन उमेदवार विजयी

दैनिक वादळ वार्ता
**उदगीर । प्रतिनिधी**

उदगीर विधानसभा मतदारसंघातील उदगीर तालुक्यात असलेल्या सात जिल्हा परिषद गटामध्ये विद्यमान आमदार संजय बनसोडे यांनी जीवाचे रान करून सात पैकी पाच जिल्हा परिषद गटामध्ये महायुतीला विजय मिळवून दिला आहे. मोठ्या जिद्दीने लढत देत कॉंग्रेसने ही दोन जागेवर दणदणीत विजय मिळवला आहे. या निवडणुकीमध्ये उदगीर तालुक्यात भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी चुकीचे उमेदवार दिल्याचा जो आरोप होत होता, त्या आरोपाचा फटका भाजपला बसलेला आहे. इतकेच नाही तर एकूण भाजपची पकड पूर्णपणे ढिल्ली झाली आहे. याला भारतीय जनता पक्षाचे नेतेमंडळीच कारणीभूत असल्याचे बोलले जात आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती ही निवडणूक कार्यकर्त्यांची निवडणूक असते, तरीदेखील विद्यमान आमदार संजय बनसोडे यांनी ही निवडणूक जणू आपली स्वतःची आहे, असे समजून मतदारसंघातील प्रत्येक जिल्हा परिषद, पंचायत समिती गट आणि गणामध्ये सभा घेऊन, पदयात्रा काढून, मतदारांच्या गाठीभेटी करून महायुतीचे वर्चस्व कायम टिकवुन ठेवण्यामध्ये यश मिळवले आहे.

कॉंग्रेससाठी दिवाळी लागणारा पराभव हा वाढवणा जिल्हा परिषद गटातील ठरणार आहे. या गटामध्ये भारतीय जनता पक्षाचे नेते रामभाऊ तिरुके हे ८२६८ मते घेऊन विजयी झाले आहेत, त्यांचे प्रतिस्पर्धी कॉंग्रेस पक्षाचे उमेदवार नागोराव चिमनदरे ७९८८ मते घेऊन निसटता पराभव सहन केला आहे. भाजपचे नेते रामभाऊ तिरुके पराभूत व्हावेत त्यासाठी भाजपच्या काही लोकांनी हस्ते परहस्ते कॉंग्रेसच्या उमेदवाराला मदत केल्याची चर्चा चालू होती.

मात्र दैव बलवत्तर म्हणून रामभाऊ तिरुके विजयी झाले आहेत.

सोमनाथपूर जिल्हा परिषद गटामध्ये भारतीय जनता पक्षाचे कमळ फुलले आहे. भाजपच्या उमेदवार भुजबळे उषा यमुनाजी यांनी ८८३२ मते मिळवत विजय खेचून आणला आहे. कॉंग्रेसच्या तोंडारे जयश्री मनोहर यांना ५३२८ मते मिळाले आहेत. नळगीर जिल्हा परिषद गटामध्ये कॉंग्रेस पक्षाच्या गायकवाड रूपाली प्रशांत यांनी ५८६७ मते घेऊन विजय संपादन केला आहे. त्यांच्या प्रतिस्पर्धी शिवसेनेच्या आंबेगावे साधना बाबुराव यांना ५००७ मते मिळाली, तर भारतीय जनता पक्षाच्या उमेदवाराला तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले.

निडेबन जिल्हा परिषद गटामध्ये डॉक्टर दीपक संग्राम सोमवंशी यांनी ९२६८ मते घेऊन दणदणीत विजय मिळवला आहे. त्यांचे प्रतिस्पर्धी कॉंग्रेसचे पाटील रणजीत मल्हारी यांना ४८४६ मतावर समाधान मानावे लागले.

लोहारा जिल्हा परिषद गटात आपल्यावर अन्याय झाला म्हणून महायुतीचे सक्रिय कार्यकर्ते असलेले भालेराव मुकेश भिवाजी यांनी ऐनवेळी कॉंग्रेसचा हात हातात धरला आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या रिंगणात ते उभा राहिले. त्यांनी ८१०२ मते मिळवून आपले प्रतिस्पर्धी भाजपाचे उमेदवार कांबळे विजयकुमार केरबा यांच्या विरुद्ध विजय खेचून आणला. विजयकुमार कांबळे यांना ५३८९ मते मिळाली. हेर जिल्हा परिषद गटामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसचे मटके दिलीप कुमार मारुती यांनी ९०६७ मते मिळवत दणदणीत विजय मिळवला आहे. त्यांचे प्रतिस्पर्धी शिवसेनेचे सूर्यवंशी अविनाश सोपान यांना केवळ ३२४१ मतावर समाधान मानावे लागले. या ठिकाणी कॉंग्रेस पक्षाला तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले.

तोगरी जिल्हा परिषद गटामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बिरादार



ज्ञानेश्वर हरिभाऊ यांनी ९६०१ मते मिळवून विजय मिळवला. त्यांचे प्रतिस्पर्धी कॉंग्रेसचे शिवाजी ज्ञानोबा मुळे यांना ७५४६ मतावर समाधान मानावे लागले.

पंचायत समिती गणातून हंडरगुळी येथून भारतीय जनता पक्षाचे भोसले बापूसाहेब उद्धवराव यांनी ४७२२ मते घेऊन विजय मिळवला त्यांचे प्रतिस्पर्धी कॉंग्रेस पक्षाचे माने माधव बाबुराव यांना केवळ ३२१५ मते मिळाली.

वाढवणा पंचायत समिती गणातून बंडखोर उमेदवार सुरेखा सर्जेराव भांगे पाटील यांनी २५५२ मते घेऊन विजय मिळवला. त्यांच्या प्रतिस्पर्धी उमेदवार अपक्ष उमेदवार शेख नेहा रउफ यांना २१८६ मते मिळाली तर भारतीय जनता पक्षाला तिसऱ्या क्रमांकावर राहावे लागले. गुडसूर पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उमेदवार वनमाला तात्यारेड्डी मरलापल्ले यांनी ३४०५ मध्ये घेऊन विजय मिळवला. त्यांच्या प्रतिस्पर्धी उमेदवार कॉंग्रेस पक्षाच्या गोणसे सुनीता राहुल यांना २१७१ मते मिळाली.

सोमनाथपूर पंचायत समिती गणातून भारतीय जनता पक्षाच्या बिरादार सरमंगला मनोहर यांनी ४४४७ मते घेऊन विजय मिळवला. प्रतिस्पर्धी उमेदवार कॉंग्रेस पक्षाच्या हैबतपुरे छायाबाई बालाजी यांना २४५१ मते मिळाली. नळगीर पंचायत समिती गणातून नादरगे धनराज धर्मपाल यांनी २९१६ मते घेऊन विजय मिळवला. त्यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार गाताटे विलास घाळप्पा २७५० मते मिळाली. नागलगाव पंचायत समिती गणातून केवढे शिल्पा शक्ती या कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवार ३१४६ मते घेऊन विजयी झाले आहेत. त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपाच्या उमेदवार वाघे सुप्रिया संतोष यांना २४३९ मतावर समाधान मानावे लागले.

शिरूर जानापुर पंचायत समिती मनातून राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या राठोड सुनीता प्रकाश यांनी ४४७२ मते घेऊन विजय मिळवला. प्रतिस्पर्धी उमेदवार कॉंग्रेस पक्षाचे आडे कृष्णा वामन यांचा पराभव केला. आडे यांना २८४२ मतावर समाधान मानावे लागले.

निडेबन पंचायत समिती गणातून चिखले विमल भिवाजी यांनी ४६९१ मते घेऊन विजय मिळवला. त्यांचे प्रतिस्पर्धी कोयले मनीषा संदीप यांना केवळ १९३५ मतदान मिळाले.

लोहारा पंचायत समिती गणातून कॉंग्रेस पक्षाचे जाधव भास्कर मधुकर यांनी ३८१६ मते मिळवून विजय मिळवला. त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपचे उमेदवार रकसाळे बालाजी संग्राम यांना केवळ २१६८ मतदान झाले. कुमठा खुर्द पंचायत समिती गणातून कॉंग्रेस पक्षाचे उमेदवार अंधारे बालाजी केरबा यांनी ३६९१ मतदान घेऊन विजय मिळवला. भारतीय जनता पक्षाचे रणक्षेत्रे रामकिशन गोरख यांना केवळ २६३७ मते मिळाली.

हेर पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सोनकांबळे काशीबाई बळीराम यांनी २७८९ मते मिळवून विजय मिळवला. प्रतिस्पर्धी उमेदवार शिवसेनेच्या कसबे रेखा रणजीत यांना १९४९ मतावर समाधान मानावे लागले.

देवर्जन पंचायत समिती गणातून अपक्ष कांबळे चंद्रकांत गोविंद यांनी तीन ३६५३ मते घेऊन कॉंग्रेसचे गिलचे अमोल अशोक(१८७८) यांचा दणदणीत पराभव केला. दावणगाव पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या फुले कोमल कमलाकर यांनी ५३७० मते घेऊन विजय मिळवला. त्यांच्या प्रतिस्पर्धी खटके सुनिता चंद्रप्रकाश यांना ३५७० मतावर समाधान मानावे लागले.

तोगरी पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बिरादार प्रकाश नागेंद्र यांनी ३७३७ मते घेऊन दणदणीत विजय मिळवला. त्यांचे प्रतिस्पर्धी कॉंग्रेस पक्षाचे पाटील शिवपुत्र राजकुमार यांना ३२८२ मते तर शिवसेनेचे बिरादार शिवाजी बालाजी यांना १२३५ मतावर समाधान मानावे लागले.

# सायाळ येथे १०० जलतारा प्रकल्पाचे भूमिपूजन
# जिल्हाधिकारी कर्डिले यांचे शेतकऱ्यांना सखोल मार्गदर्शन

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । राजकुमार पिल्लोळ**

नांदेड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सायाळ येथे १०० जलतारा प्रकल्पाचे भूमिपूजन केले. या प्रकल्पासाठी एस.एस.पी. संस्थेमार्फत शेतकऱ्यांना अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे.यावेळी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी कर्डिले म्हणाले की, शेतकऱ्यांनी नवनवीन प्रयोग करून शेतीतून अधिक उत्पादन घेतल्यास त्यांची आर्थिक परिस्थिती निश्चितच सुधारू शकते. दूध व्यवसाय व त्यावर प्रक्रिया केल्यास शेतकऱ्यांना अधिक लाभ होईल. शासनाच्या योजनांची वाट न पाहता प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या शेतात प्रति एकर एक जलतारा तयार केल्यास भूजल पातळी वाढेल, विहिरी व बोअरवेलचे पाणी वाढेल आणि त्याचा थेट फायदा स्थानिक शेतकऱ्यांना होईल. सायाळ येथील शेतकरी रत्नाकर ढगे पाटील हे लवकरच शेती अभ्यासासाठी इस्त्रायल दौऱ्यावर जाणार असून, जिल्हाधिकारी महोदयांनी त्यांचा सहपत्नी सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



इस्त्रायलमधील कमी पाण्यात अधिक उत्पादन देणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यास नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी लाभदायक ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.सायाळ गावामध्ये मोठ्या प्रमाणावर विविध शेती प्रयोग सुरू असून अशा प्रयोगांना प्रशासनाकडून सातत्याने प्रोत्साहन दिले जाईल, असे जिल्हाधिकारी कर्डिले यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी रेशीम उद्योगाकडे वळावे, तसेच जलतारा, नाला सरळीकरण, घन लागवड व फळबाग लागवड या तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकतो, असे मत त्यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमात जिल्हाधिकारी कर्डिले यांनी तब्बल अडीच तास शेतकऱ्यांसोबत श्रमदान केले. तसेच शेतकरी महिला गटांना मार्गदर्शन केले. त्यांनी रत्नाकर ढगे यांच्या शेतीतील बांधावरील प्रयोगशाळेची पाहणी केली. जैविक निविष्ठा व औषधी उपलब्ध झाल्यास पर्यावरणपूरक नैसर्गिक शेतीकडे शेतकरी वळतील, असे त्यांनी सांगितले. जिल्हा परिषद कृषी विभागाच्या डाळ मिल प्रकल्पाची पाहणी करून माहिती घेतली तसेच ढगे पाटील फार्म हाऊसवरील जर्सी गायींच्या दूध व्यवसायाबाबत समाधान व्यक्त केले. सायाळ गावाने शंभर टक्के जलतारा प्रकल्प राबवून गाव पाणीदार करावे, असे आवाहन करत जिल्हाधिकारी म्हणाले, जलतारा स्वतः शेतात खणल्यास फारसा खर्च येत नाही. आवश्यक साहित्य शेतातच उपलब्ध असल्याने कमी खर्चात जलतारा तयार होतो. मी स्वतः माझ्या घराच्या प्रांगणात जलतारा करणार आहे. यावेळी जिल्हा परिषद शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास लोहा तहसीलचे तहसीलदार विठ्ठल परळीकर, लोहा पोलीस स्टेशनचे निरीक्षक नागनाथ आयलाने, मंडळ अधिकारी रेनके, उपविभागीय अधिकारी लक्ष्मण हांडे, तलाठी पांडागळे, कृषी सहाय्यक तांबोळी, एस.एस.पी. संस्थेचे राजाभाऊ जाधव, पाणी फाउंडेशनचे राजाभाऊ कदम, प्रगतशील शेतकरी ज्ञानोबा येवले, चांदोजी जामगे, कपिल वानखेडे, रेवती कानगुले, प्रगती महिला गट पारडी, कृष्णा भालेराव, महादेव चिंचले, आनंदा जाधव, मनोज जाधव, माजी सरपंच संभाजी ढगे यांच्यासह सायाळ परिसरातील असंख्य शेतकरी उपस्थित होते.

# आहिल्यादेवी आश्रम शाळेचे वार्षिक स्नेह संमेलन संपन्न

## विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी ह्या स्नेहसंमेलनाचे आयोजन एक सकारात्मक पाऊल–डॉ.देवराव चामणकर

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

इतर मागास बहूजन कल्याण विभागा अंतर्गत आणि श्री.छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था आडस संचलित अहिल्यादेवी प्राथमिक व उच्च प्राथमिक आश्रम शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन १० फेब्रुवारी रोजी शाळेच्या प्रांगणात अतिशय उत्साहात आयोजित करण्यात आले.या स्नेहसंमेलनात ज्ञान आणि कलेचा अविष्कार ह्या दोन प्रमुख गोष्टींवर विशेषभर देण्यात आला.स्नेहसंमेलनात प्रमुख अतिथी म्हणून डॉ. सचिन कस्तुरे,डॉ.देवराव चामणकर,डॉ.संदीप जैन, मा.मु.हंडीबाग सर,शाळेचे मुख्याध्यापक श्री.धेंडे सर थळकरी सर,पत्रकार विजय आरकडे,लाडेकर सर,पालक केकाण सर,




नागरगोजे सर,नखाते सर यांची उपस्थिती होती.शाळेचे मुख्याध्यापक श्री. सोन्नर सर यांनी स्नेहसंमेलनाची प्रस्तावना केली.यावेळी त्यांनी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या विविध सुविधांबद्दल तसेच शालेतील शिक्षण आणि त्यांच्या सर्वांगीण विकासाबद्दल सविस्तर माहिती दिली.प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे खूप कौतुक केले आणि शाळेतील विद्यार्थ्यांना या मंचावर आपले कला कौशल्य प्रकट करण्यासाठी दिलेल्या संधीसाठी शाळेचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी नृत्य,गायन, अभिनय,व इतर मनोरंजनात्मक कार्यक्रमांमध्ये आपल्या कला सादर केल्या आणि शाळेचा प्रत्येक कोपरा उत्साही वातावरणाने गाजला.आश्रम शाळेतील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासोबतच त्यांच्या कलागुणांना वाव देण्याचा महत्त्वपूर्ण कार्य प्रगतीसाठी चालू आहे, असे प्रमुख पाहुण्यांनी सांगितले.शाळेच्या विद्यार्थ्यांच्या भविष्या साठी ह्या स्नेहसंमेलनाचे आयोजन एक सकारात्मक पाऊल ठरले आहे.या कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन पोटभरे सर यांनी केले तर स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक,शिक्षक, शिक्षिका,शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.यावेळीपरिसरातील नागरिक व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# अव्दैत,मृणाल यांचा विवाह सोहळा थाटामाटात संपन्न,विविध क्षेत्रातील मान्यवरांनी वधुवरांस दिले शुभाशिर्वाद



दैनिक वादळ वार्ता
**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथील निवृत्त अधिष्ठाता डॉ.सतिश गोपाळराव देशपांडे (मोहरीर) यांचे सुपुत्र चि.डॉ.अव्दैत व सतिश राजेश्वर पाथ्रडकर यांची कन्या चि.सौ.का.डॉ. मृणाल विवाह सोहळा शुक्रवार दि.०६ फेब्रुवारी यवतमाळ येथील बालकृष्ण मंगलम येथे थाटामाटात संपन्न झाला. मान्यवरांचे स्वागत विष्णुपंत देशपांडे, प्रा.रत्नाकर देशपांडे, डॉ.नितीन देशपांडे, निलिमा ढवळे,दिलीप ढवळे,पत्रकार संघाचे मा.कार्यवाह राहूल देशपांडे,डॉ.संदीप देशमुख,श्रीराम,निलेश, अभि,योगेश्वरी नागरी सहकारी पत संस्थेच्या संचालिका कल्याणी देशपांडे,डॉ.अपूर्वा देशमुख,अमृता,डॉ. अश्विनी,शितल,डॉ. अर्चना देशपांडे,विशाखा देशपांडे,जयश्री देशपांडे, सरिता कुलकर्णी,वैजयंती पाथ्रडकर आदींनी केले. या विवाह सोहळ्यासाठी नवविवाहित वधू वरांस शुभेच्छा व आशिर्वाद देण्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# येवता येथे त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांची १२८वी जयंती उत्साहात साजरी

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

येवता ता.केज येथे त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांची १२८ वी जयंती अत्यंत उत्साहात आणि धम्ममय वातावरणात बौद्ध विहारात साजरी करण्यात आली.यावेळी गावातील नागरिक,महिला आणि तरुण मंडळाने एकत्र येत माता रमाईंच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला.

माता रमाईंच्या त्यागाला अभिवादन कार्यक्रमाची सुरुवात माता रमाई यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली.यावेळीउपस्थितांनी माता रमाईंच्या जीवनावर प्रकाश टाकला.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विश्वरत्न होण्यामागे माता रमाई यांचा मोठा त्याग होता.अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतही त्यांनी धिर न खचता बाबासाहेबांना साथ दिली,असे विचार यावेळी व्यक्त करण्यात आले.प्रमुख उपस्थितीत या अभिवादन कार्यक्रमाला



उपासक, उपासिका,राजकीय आणि सामाजिक मान्यवरांनी उपस्थिती लावली होती.यामध्ये लिंबराज गायकवाड वंचित बहुजन आघाडी, सुरज काळे रिपाई आय टी सेल ता.अध्यक्ष व धम्म बांधव,महिला बालासाहेब गायकवाड,संजय गायकवाड,राहुल काळे वचिष्ट साळवे,सचिन गायकवाड माजी ग्राम पंचायत सदस्य,विनोद काळे,सिद्धार्थ काळे, रोहित गायकवाड,वैभव जाधव,पृथ्वीराज गायकवाड व इतर ग्रामस्थ महिलांचा मोठा सहभाग लाभला.यावेळी भीमशक्ती बचत गटाच्या अध्यक्षा.रजनी गायकवाड,सुरेखा गायकवाड,एकल महिला संघटनेच्या रतन गायकवाड व इतर उपासिका मंदाकिनी गायकवाड,वंदना गायकवाड,सिमा काळे, निकीता काळे यांच्यासह गावातील उपासक.उपासिका व इतर प्रतिष्ठित नागरिक आणि लहान–थोर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. महिलांचा मोठा सहभाग विशेष म्हणजे,या जयंती उत्सवात गावातील महिलांचा सहभाग लक्षणीय होता.यावेळी माता रमाईंचा विजय असो आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो अशा घोषणांनी परिसरदणाणून सोडला होता.शेवटी उपस्थित सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# १२ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या देशव्यापी लाक्षणिक संपात अंगणवाडी सेविका घेणार सहभाग

दैनिक वादळ वार्ता
**रवींद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी**

मध्यवर्ती सरकारने कामगार/ कर्मचारी हिताचे असलेले कायदे रद्द करून चार श्रम संहिता लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. सदर श्रम संहिता ह्या कामगार/ कर्मचारी विरोधी असून त्या रद्द कराव्यात आणि अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या नमूद प्रलंबित मागण्या सोडवाव्यात यासाठी अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा दि.१२ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या देशव्यापी लक्षणिक संपात सहभागी होण्याचा निर्णय समन्वय समितीने घेतला असल्याचे निवेदन राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, वित्त व नियोजन मंत्री, महिला व बालविकास मंत्री यांच्यासह सचिव, महिला व बालविकास विभाग, आयुक्त,एबाविसे योजना,नवी मुंबई यांना देण्यात आले आहे.

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, केंद्र सरकारने आणलेले कामगार/कर्मचारी विरोधी कायदे रद्द करावेत, अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देऊन वेतन व भत्ते लागू करावेत, सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार अंगणवाडी सेविका मदतनीसांना ग्रॅज्युटी लागू करावी, गुजरात उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सेविकांना २४८००/– रुपये आणि मदतनीसांना २०४००/– रुपये वेतन लागू करावे, अंगणवाडी सेविका मदतनिसांना कामावर आधारित प्रोत्साहन भत्ता न देता तो मानधनात वर्ग करुन सरसकट लागू करण्यात यावा, योजना कर्मचाऱ्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करुन दरमहा पेन्शन लागू करण्यात यावी, अंगणवाडी कर्मचाऱ्यांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या कामाचा थकीत मोबदला तातडीने अदा करावा, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या कामासह अन्य योजनबाह्य कामे अंगणवाडी कर्मचाऱ्यांना देण्यात येऊ नयेत, अंगणवाडी सेविका मदतनीसांना दरवर्षी पंधरा दिवसांऐवजी एक महिना उन्हाळी सुट्टी देण्यात यावी, अंगणवाडी कर्मचाऱ्यांना आजारपणाची भरपगारी रजा लागू करावी, एफ.आर.एस. करण्यात येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर करण्यात याव्यात, अंगणवाडी कर्मचाऱ्यांना पोषण ट्रॅकरच्या कामाचा विचार करुन ५ जी मोबाईल देऊन दरवर्षी ३६०० /– रुपये मोबाईल रिचार्जसाठी देण्यात यावेत.

या आणि अन्य मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी देशव्यापी होणाऱ्या लाक्षणिक संपात राज्यासह जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका मदतनीसांनी शंभर टक्के भागीदारी करुन संपाच्या दिवशी अंगणवाडी केंद्राचे कोणतेही दैनंदिन काम न करता पोषण ट्रॅकर उघडू नये आणि कोणतीही माहिती ऑनलाईन भरु नये. सदर संपात सेविका मदतनीसांनी शंभर टक्के भागीदारी करुन यशस्वी करावा असे आवाहन रामकृष्ण बी.पाटील, युवराज बैसाणे, राजू पाटील, वकील पाटील, अमोल बैसाणे यांनी केले आहे.

# श्री महेश लातूरकर लिखित तहानलेलं बेट या कादंबरीचा प्रकाशन सोहळा संपन्न!

दैनिक वादळ वार्ता
**मुबंई । दत्ता खंदारे**

श्री महेश लातूरकर लिखित तहानलेलं बेट या कादंबरीचा प्रकाशन सोहळा नगरसेवक श्री. प्रकाश भाऊ दरेकर यांच्या हस्ते रविवार दि. ८फेब्रुवारी २०२६ रोजी दहीसर येथे मोठया दिमाखात संपन्न झाला.

महेश लातूरकर यांनी लिहिलेल्या दुसऱ्या तहानलेलं बेट या कांदबरी प्रकाशन सोहळ्यास मराठा एकीकरण समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख, अखिल भारतीय वीरशैव कक्कया समाज संस्था मुंबईचे अध्यक्ष मा.श्री.व्यंकटराव शिंदे,उपाध्यक्ष श्री.सुखदेव शिंदे,कामगार नेते, महाराष्ट्र शासन पुरस्कार्थी, सरचिटणीस महाराष्ट्र राज्य शासकीय कर्मचारी महासंघ मुंबईचे मा.श्री.सुर्यकांत इंगळे,विधानसभा संघटक दादाभाऊ पानमंद , उपविभाग संघटक श्रीमती उषाताई कोरगावकर




,वरिष्ठ पोलीस निरीक्षक मा. श्री.करण सोनकवडे ,वरिष्ठ पोलीस निरीक्षक मा. श्री.विवेक सोनवणे, दहिसर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक श्री.अशोक घुगे,ऍड. अभियंता कवी श्री.मैलारीराज कावळे,कवी श्री .रमेश आव्हाड इत्यादी मान्यवर मंडळी मोठया संख्येने यावेळी उपस्थित होती.

याप्रसंगी नगरसेवक प्रकाश दरेकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले कि, लेखकाने अतिशय सुंदर आणि अर्थपूर्ण रहस्यमय गुण कथा आपल्या तहानलेलं बेट या कांदबरीत उलगडून दाखवले आहे. मुंबई देखील एक बेट आहे.पण ती तहानलेली नाही तर सुखावलेली आहे.मी ही लेखक आहे.माझी ही पुस्तके प्रकाशित झाली आहेत.लेखक सर्व अंगांनी विचार करुन समाजाला पुस्तक रुपाने अनुभव देत असतो.सर्वांनी हे पुस्तक वाचावे असे आवाहन केले. अन्य उपस्थित मान्यवरांनी लेखकाला शुभेच्छा दिल्या. रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला.तसेच यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.प्रसंगी श्री.कमल चिलबी शाखाप्रमुख ,बापू गेजगे ,शाखा संघटक ,हेमाताई मयेकर कार्यालय प्रमुख, गुलाब हेमाडे व इतर विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थित मध्ये प्रकाशन सोहळा संपन्न झाला.या कार्यक्रमाचे आयोजन आणि निमंत्रक भानुदास कावळे पाटील आणि ओम प्रकाश कावळे पाटील यांनी उपस्थित. मान्यवरांचे आणि सर्व बंधु भगिनींचे आभार मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077